# हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील आर्य समाजाचे योगदान

प्रा.डॉ. दिनकर भिमराव झेंडे
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
जि.नांदेड–मोबा.942146724

ब्रिटीश साम्राज्याच्या जोखडातून 15 ऑगस्ट 1947 ला भारत मुक्त झाला असला तरी मराठवाडा तेलंगण, कर्नाटक प्रदेश मात्र गुलामीतच होते. हे प्रदेश हैद्राबाद संस्थानातील होते. हैद्राबादचा संस्थानिक होता मीर उस्मान अली(सातवा निजाम) मुघल बादशहा महमदशहाने मीर कमरूद्दिनला असजशहा हा किताब दिला होता.[1] तेंव्हापासून या घराण्याला असफजाही घराणे असे म्हटले जाते. निजाम मीर उस्मान अली(सातवा निजाम 19.11.1948) भारतीय संघराज्यात सामील होण्यास तयार नव्हता. त्याने स्वतंत्र राहण्याचा निर्णय जाहीर केला. भारतीय संघराज्यच्या अखंडतेसाठी आणि सुरक्षिततेसाठी निजामाचे स्वतंत्र राहण्याचे धोक्याचे होते. म्हणून हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यामध्ये सामील व्हावे यासाठी संघराज्यातील जनतेनी निजामाविरूध्द प्रखर लढा उभारला .सन 1938 ते 1948 या कालावधीमध्ये संस्थानातील जनतेच्या अधिकारासाठी  व संस्थान भारतात सामील व्हावे यासाठी अनेक स्तरातून, संघटनाकडून आंदोलन उभारले. यालाच हैद्राबाद मुक्ती आंदोलन म्हटले जाते. 17 सप्टेंबर 1948 रोजी पोलिस कारवाईने भारत सरकारने हैद्राबादचे संस्थान भारतात विलिन करून घेतले.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामधील हैद्राबाद मुकती आंदोलन एक महत्वाचे पर्व होय . भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासाला हैद्राबाद मुक्ती आंदोलनाच्या इतिहासाशिवाय पूर्णत्व येवू शकत नाही. हैद्राबाद मुक्ती लढयातील हैद्राबाद स्टेट कॉग्रेस ही प्रमुख संघटना असली तरी या आंदोलनामध्ये इतर अनेक संस्था, संघटनाचेही योगदान महत्वाचे होते. त्यामध्ये आर्य समाजाचे योगदान , भूमिका महत्वपूर्ण ठरते. पण हैद्राबाद मुक्ती आंदोलनाच्या इतिहासामध्ये आर्य समाजाच्या योगदानाची फारसी नोंद घेतली नाही. हा लढा म्हणजे स्टेट कॉग्रेसचाच लढा मानला जातो. पण या आंदोलनाची सुरूवातच मुळात आर्य समाजाने केली. ही बाब अनभिज्ञ राहिली. ''हैद्राबाद संस्थानात आर्य समाजानेच सत्याग्रह व स्वातंत्र्याचे रणसिंग सर्वात आधी फुंकले व प्रभावितपणे संघर्ष केला. ''[2] असे स्पष्ट मत गो.रा.म्हैसेकर यांनी व्यक्त केले.

हैद्राबाद स्टेट कॉग्रेसवर निजामाने घातलेली बंदी उठविल्यापासून म्हणजे 1946 पासून मुक्ती आंदोलनाची तीव्रता वाढली असली तरी या मुक्ती आंदोलनाची सुरूवात 1938 पासूनच झाली होती. या कालखंडामध्ये संस्थानातील  आर्य समाजाचे कार्य महत्वपूर्ण ठरते.

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वतींनी मुंबईत 1875 साली केली. हिंदू धर्मातील वाईट रूढी परंपरामुळे विघटीत झालेल्या हिंदू समाजाला संघटीत करणे, हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन करणे

हा उद्देश दयानंद सरस्वतीचा असला तरी पारतंत्र्यांत खितपत पडलेला हिंदू समाज गुलामगिरीतून आणि बौध्दिक दास्यत्वातून मुक्त करणे हा ही उद्देश होता. या दृष्टिकोनातून स्थापन झालेल्या आर्य समाजाच्या शाखा देशभर निर्माण झाल्या. ख्रिश्चन आणि मुस्लीमांच्या धर्मांतराला ब्रह्मोसमाजाने थोपविले असते तरी ब्रम्होसमाजाच्या कार्यप्रणालीमध्ये स्वदेशाभिमानाची भावना नव्हती. याची खंत दयानंद सरस्वतींना होती. त्यामुळेच त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणाबरोबरच स्वदेशभिमान वाढीस लावणे.[3] हे ही कार्य समाजाचे उद्दिष्ट मांडले.

**हैद्राबाद संस्थानातील आर्य समाजाचे स्थापना–**

हैद्राबाद संस्थानामध्ये आर्य समाजाची शाखा प्रथम बीड जिल्हा ता.धारूर येथे 1891 साली स्थापन झाली. पं. भगवती प्रसाद, कुंदन प्रसादजी, गोकुळ प्रसादजी, मगनलालजी, रामचंद्र भाईजी, माणिक प्रसादजी, बाबूरावजी वैद्य, बाबू गणेशसिहंजी वर्मा, बन्सीलालजी तिवारी, रावसाहेब श्रीवास्तव.[4] आदीचा या स्थापनेमध्ये महत्वाचा सहभाग होता. पुढच्याच वर्षी म्हणजे 1892 ला आर्य समाजाची शाखा हैद्राबादला सुलतानबजार येथे स्थापन झाली. हैद्राबादमधील या शाखेच्या स्थापनेसाठी स्वामी दयानंद सरस्वतीची शिष्य स्वामी गिरजानंदजी प्रज्ञाचक्षू यांचा मुख्य सहभाग होता. या शाखेचे अध्यक्ष कांताप्रसादची आणि सचिव लक्ष्मणदासजी होते.5 अल्पकाळात हैद्राबाद संस्थानामध्ये आर्य समाजाच्या अनेक शाखा स्थापन झाल्या. ब्रिटीश अंमलाखाली प्रदेशापेक्षा हैद्राबाद संस्थानात मराठी भाषिक प्रदेशात, मराठवाडयात आर्य समाजाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. त्यातही मराठवाडयातील उस्मानाबाद, लातूर आणि नांदेड या जिल्हयात आर्य समाजाचा अधिक प्रभाव होता. उस्मानाबाद जिल्ह्यात अघोरनाथ चटोपाध्याय, श्रीपादराव सातवळकर, पुरूषोत्तम माशाळकर, बलभिम हिंगे, बापूराव मास्तर, देविदास मुरूमकर, उदगिरीचे बन्सीलालजी व शामलालजी, निलंग्याचे शेषेराव वाघमारे, केशवराव कोरटकर, जालन्याचे हरिशचंद्रजी, औरंगाबादचे नरदेवजी स्नेही, हिंगोलीचे पन्नालालजी आदींनी आर्य समाजाचे कार्य व प्रसार केला. हिंदू समाजातील अनिष्ठ प्रथा, जातीयता, सक्तीचे धर्मांतर, वैदिक धर्मांचे पुनरूज्जीवन या विषयास अनुसरून आर्य समाजाने कार्य केले. असे असले तरी आर्य समाजाचे कार्य एवढयापुरतेच मर्यादित नव्हते. संस्थानातील जनतेच्या विशेषतः हिंदू समाजाच्या नागरी स्वातंत्र्यासाठी देखील आर्य समाजाने कार्य केले. त्याकाळी आर्य समाजाने लोकांच्या मनामध्ये राष्ट्रीयत्वाला व जहाल राजकारणालना हिंदू समाजातील राजकीय क्रांतीला चालना दिली. [6] लोकांना संघटीत करून त्यांच्यात धार्मिक व राष्ट्रीय अस्मिता जागवली. या राष्ट्रवादी जाणिवेतून नंतरच्या काळात हैद्राबाद मुक्ती आंदोलन व्यापक बनले.

**लोक संघटन व लोकजागृती–**

धार्मिक सुधारणाच्या तत्वावर स्थापन झालेल्या आर्य समाजाने संस्थानामध्ये लोकात राजकीय जागृती निर्माण केली. कोणताही संघर्ष किंवा लढा असो त्यासाठी लोकांना तयार करणे तितकेच महत्वाचे असते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळी दरम्यान लो. टिळकांनी लोकामध्ये जागृती, संघटन करण्यासाठी म्हणून शिवजयंती आणि सार्वजनिक गणेशोत्सोव सुरूवात केली . त्याला व्यापकता मिळवून दिली. म्हणजेच जसा उपयोग टिळकांनी गणेशउत्सव व शिवजयंतीचा करून घेतला तसेच कार्य आर्य समाजाने केले. लोकसंघटन हेच स्वातंत्र्य आंदोलनाची पहिली पायरी असते. आर्य समाजाने व्यायामशाळा, समाजमंदिरे, वाचनालये, आखाडे स्थापन करून या माध्यमाने हिंदू समाजाला संघटित करण्याचे कार्य केले.

आर्य समाजाच्यावतीने गावोगावी स्थापन केलेली समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालये, आखाडे देशभक्तीची प्रमुख केंद्रे बनली होती. त्याकाळी देशभक्तीची एक अविभाज्य भाग म्हणून बलोपासना एक अनिवार्य बाब मानली जाई. त्यामुळे आखाडे आणि व्यायामशाळा यांना देशभक्तीचे प्रेरक केंद्राचे स्वरूप प्राप्त झाले होते. या माध्यमाने आर्य समाजाने लोकामध्ये निजामी राजवटीत होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूध्द आंदोलन सुरू केली. निजाम पुरस्कृत मुस्लीम संघटनांच्या सक्तीच्या धर्मांतरांस विरोध करून आर्य समाजाने शुध्दीकरण चळवळ चालविली. हिंदू धर्मीयाचे होणारे धर्मांतर आर्य समाजाने थांबविले. म्हणूनच निजाम सरकारने आर्य समाजाच्या सभ, प्रवचन , यज्ञ, होम हवन, यावर बंदी घातली. 1929 साली यासाठी गस्ती 52 व 53 तयार करण्यात आले. आर्य समाजाच्या ओम् हा मंत्र असलेला ध्वज फडकावण्यासही मनाई केली. 7 अशा प्रतिकूल परिस्थितही हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाकडून शिक्षण व राजकीय परिषदा आयोजित करून लोकजागृती व संघटन केले जाई. आर्य समाजाचे राघवेंद्र शर्मा यांना 1923 ला संस्थानात काकीनाडा येथे राजकीय परिषद घेतल्यामुळे निजामाने हद्दपार केले होते. आर्य समाजाचे हैद्राबाद संस्थानातील दोन अध्वर्यू वामनराव नाईक आणि केशवराव कोरटकर यांनी या व्यायामशाळा , वाचनालये या माध्यमाने तरूणामध्ये स्वाभिमानाची, अस्मितेची भावना निर्माण केली. बॅ. कोरटकरांनी हिंदू स्टॅंडींग कमिटी मार्फत निजाम सरकारने घातलेले विविध निर्बंध रद्द करावेत व संस्थानातील जनतेस नागरी हक्क मिळावेत यासाठी निजामाकडे पाठपुरावा केला. निजामाचे पंतप्रधान महाराणा किशन प्रसाद यांना 20 मार्च 1930 रोजी आर्य समााजचे कांही कार्यकर्ते भेटून निवेदन दिले होते. अशाप्रकारे आर्य समाजाने विविध माध्यमाने लोकांना संघटीत करून त्यांच्या मनात राजकीय जागृती करण्याचे कार्य केले.

**सत्याग्रह–**

निजाम सरकार आणि त्याने हाताशी धरलेल्या अनेक मुस्लीम संघटनाकडून संस्थानातील हिंदू धर्मीयावर अन्याय अत्याचार केले जात. त्यांच्यावर अनेक निर्बंध लादले होते. ज्या गावामध्ये मुसलमानांची

संख्या अधिक असेल त्या गावामध्ये हिंदू देवस्थानांचा विस्तार करू नये. दुरूस्ती करू नये. [8] असे फर्मान काढले होते. अशा अनेक निर्बंधाविरूध्द आर्य समाजाने विविध आंदोलन उभारली. त्या आंदोलनात 1938 ला केलेल्या सत्याग्रहाला महत्व आहे.

हैद्राबाद संस्थानात स्टेट कॉंग्रेसने 24 ऑक्टोंबर 1938 ला सत्याग्रह सुरू केला. पण त्याआधी आर्य समाजाने धर्मवीर वामनराव नाईक यांच्या द्वितीय पुण्यतीथीला वीर यशवंतराव जोशी यांच्या नेतृत्वात गवळीगुडा राममंदिर येथे 21 ऑक्टोंबर 1938 ला केलेला सत्याग्रह सुरू केला होता. हाच सत्याग्रह हैद्राबाद संस्थानातील पहिला सत्याग्रह ठरतो.[9] आर्य समाजाच्या आर्य प्रतिनिधी सभेचे हैद्राबाद संस्थानामध्ये करावयाच्या सत्याग्रहाबाबत सोलापूरला माधवराव आणे यांच्या अध्यक्षतेखाली खास परिषद घेण्यात आली. त्यामध्ये भारतातील जनतेने या सत्याग्रहास पाठींबाही द्यावा त्यात सामील व्हावे असे आवाहन केले. त्यानुसार 21 ऑक्टोंबर 1938 रोजी संस्थानामध्ये आर्य समाजाच्या वतीने सत्याग्रह करण्यात आला. आर्य समाजानंतर हिंदु महासभेने ही सत्याग्रह केला. त्यांनतर स्टेट कॉंग्रेसन 24 ऑक्टोंबर 1938 पासून सत्याग्रह केला. स्टेट कॉंग्रेसची अधिकृत स्थापना होण्यापूर्वीच निजामाने 8 सप्टेंबर 1938 ला Public Sefty Regulation Act नुसार कॉंग्रेसवर बंदी घातली. स्टेट कॉंग्रेस मध्ये नुकतेच आलेल्या स्वामी रामानंद तीर्थ यांनी कॉंग्रेसवर लादलेल्या बंदीविरूध्द सत्याग्रह करण्याचे ठरविले. तसेच हा सत्याग्रह आपल्या नेतृत्वाखाली व्हावा असेही त्यांना वाटत होते. पण कॉंग्रेस कार्यकारीणीने हा सत्याग्रह प्रौढ व अनुभवी नेत्यांच्या नेतृत्वात करावा अशी भूमिका घेवून त्यांनी गोविंदराव नानल यांच्याकडे नेतृत्वासाठी आग्रह धरला. नानल हे नेतृत्व करण्यास तयार नव्हते. शेवटी कार्यकर्त्यांनी फारच गळ घातली. त्यांचे गुरू भटजी बापू महाराज यांच्या प्रतिमेसमोर चिठ्ठी टाकून त्यानीच सत्याग्रहाचे नेतृत्व करावे असे ठरले. पण लवकरच स्टेट कॉंग्रेसने आपले सत्याग्रह आंदोलन मागे घेतले कारण आर्य समाज आणि हिंदू महासभेबरोबर सत्याग्रह केल्यास त्यांच्या प्रमाणे कॉंग्रेसवरही जातीय मर्यादा पडतील आणि कॉंग्रेसच्या ध्येय धोरणाबात आणि हेतू यात गुंता होवून त्याचा कॉंग्रेसच्या अखिल भारतीय राजकारणावर विपरीत परिणाम होईल. तसेच संस्थानाच्या चळवळीत हस्तक्षेप न करणे हे ही कॉंग्रेसचे धोरण होते.[10] मूळामध्ये स्टेट कॉंग्रेसचा हा सत्याग्रह संस्थानी जनतेच्या अधिकार व स्वातंत्र्यापेक्षा निजामाने स्टेट कॉंग्रेसवर घातलेली बंदी उठवावी.[11] यासाठीचा होता. अशाप्रकारे 1938 च्या कालखंडात हैद्राबाद संस्थानामध्ये निजामाच्या अत्याचारी धोरणाविरूध्द अनेक संघटनांनी सत्याग्रह केले. पण आर्य समाजाचाच सत्याग्रह व्यापक आणि प्रभावी होता.मराठवाडयातील पाचही जिह्यातून आर्य समाजाचे असंख्य कार्यकर्ते सत्याग्रहात सामील झाले होते. पं. वेदवृत यांनी नांदेडला 513 जनासह 5 मे 1939 ला, तर बुध्देव व स्वामी सुंदरानंद यांनी औरंगाबादला सत्याग्रह केला. या सत्याग्रह आंदोलनात 7 ऑगस्ट 1939 पर्यंत आर्य समाजाचे जवळपास 12000 सत्याग्रही तुरूंगात गेले होते. [12] त्यापैकी 5000 सत्याग्रही उस्मानाबाद

जिह्यातील होते. या सत्याग्रहात पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश आदी भागातून आलेल्या असंख्य आर्य समाजिष्ठांनी सहभाग घेतला होता. आर्य समाजाच्या या सत्याग्रहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाठींबा दिला होता. [13] अशाप्रकारे हैद्राबाद संस्थानामधील नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी आणि नागरी हक्कासाठी आर्य समाजाने सर्वात प्रथम सत्याग्रह केला.

**आर्य समाजाचे बलिदानः—**

नागरी हक्कासाठी आणि स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागतो रक्त सांडावे लागते प्रसंगी समर्पण आणि बलिदानाची तयारी ठेवावी लागते. याची जाणीव आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना होती. म्हणूनच जनतेच्या संस्थानातील विशेषतः हिंदू समाजाच्या अधिकारासाठी लढतांना आर्य समाजाचे कार्यकर्तेही इतर कोणत्याही क्रांतीकारक ज्याप्रमाणे हौतात्म्य पत्करले. बलीदान केले. त्याचप्रमाणे आर्य समाजाच्याही कार्यकर्त्यांनी संस्थानातील जनतेच्या हक्कासाठी व स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेच

हैद्राबाद मुक्ती आंदोलनामध्ये पहिला हुतात्मा ठरला आर्य समाजाचाच एक कार्यकर्ता वेदप्रकाश आर्य, उस्मानाबाद जिह्यातील गुजोंटीचा वेदप्रकाश आर्य(दासमियॉ शिवबसप्पा हर्कें) हा आर्य समाजाचा कार्यकर्ता होता. संस्थानातील निजामाकडून आणि त्यांच्या पुरस्कृत मुस्लीम संघटनाकडून हिंदू समाजावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार विरूध्द वेदप्रकाश आर्य लोकसंघटन आणि लोकजागृती करून प्रतिकार करत असे. विशेषतः इत्तेहादूल मुस्लीम या संघटनेकडून केल्या जात असणाऱ्या सक्तीच्या धर्मांतरास वेद प्रकाश आर्य प्रखर विरोध करत असे. त्यामुळे मुस्लीम संघटनाच्या धर्मांतराच्या मार्गामध्ये वेदप्रकाशचा व आर्य समाजााचा अडथळा होता. म्हणून या वेदप्रकाश आर्यची गुंजोटीमध्ये 23.2.1937 रोजी हत्या घडवून आणली.

**हुतात्मा रामा मांग—**

उस्मानाबाद जिह्यातील तावशी येथील एक अस्पृश्य कुटूंबातील रामा मांग यांने आर्य समाजाची दिक्षा घेतली होती. मुस्लीम संघटनाकडून हिंदूची देवालये पाडून तेथे मशीदी बांधण्या त येत . असाच प्रयत्न तावशी येथे झाला. त्यामुळे तावशीच्या आर्य समाजाने मशिदीसाठी बांधलेला ओटा पाडून पुन्हा मंदिर उभारण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा संतापलेल्या सशस्त्र रजाकारांनी काही अरब पठाणांना तावशीला आणले. तेथे त्यांनी हिंदू समाजात दहशत पसरविली आणि मंदिर बांधण्याचे आव्हान दिले. रझाकाराचे हे आव्हान रामा मांग यांने स्वीकारले. व देवालय बांधण्यास पुढे आला तेंव्हा रझाकारांनी रामा मांगावर गोळया झाडल्या. त्यात तो गंभीर जखमी झाला. नंतर कांही लोकांनी त्याला उस्मानाबादच्या दवाखान्यात नेले. उस्मानाबादच्या दवाखान्यात त्याचा मृत्यू झाला.[14] कल्याणीचा धर्मप्रकाश हा आर्यसमाजाच कार्यकर्ता. व्यायामशाळेच्या माध्यमातून युवकांच्या मनात स्वदेशाभिमान निर्माण करत. त्यामुळे धर्मप्रकाश रझाकारांच्या व मुस्लीम संघटनाच्या द्वेषास बळी ठरला. रझााकारांनी कल्याणीच्या धर्मप्रकाशाला ठार केले.

बसवकल्याणच्या धर्मप्रकाश आर्यच्या खुनाची चौकशी करावी अशी मागणी उदगीरच्या आर्य समाजाच्या भाई श्यामलालनी निजामाकडे केली. पुढील चळवळीची दिशा ठरविण्यासाठी सोलापूरला बैठक घेण्यात आली. त्यामुळे संतापलेल्या निजामाने उदगीरला दुसऱ्या दिवशी 1937 झालेल्या दंगलीचे निमित्त करून भाई श्यामलालला अटक केली व बीदरच्या तुरूंगात ठेवले. तुरूंगातचत्यांना अन्नातून विष देवून त्यांना ठार केले. हुमनाबादच्या शिवचंद्र प्रकाश या आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांस तो पाठशाळेमधून विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती निर्माण करतो म्हणून 3 मार्च 1942 रोजी हुमनाबादला आर्य समाजाच्या मिरवणुकीवेळी शिवचंद्र व त्याचे चार साथीदारांना काही मुसलमान गुंडांनी गोळया घालून ठार मारले [15] उमरी जिल्हा नांदेड परिसरात अन्यायास प्रतिकार करणाऱ्या व जनतेस संघटीत करणाऱ्या आर्य समाजाच्या गणपतराव, गंगाराम व दत्तात्रय या तिघांना कांही पठाणांनी दगडांनी ठेचून ठार केले. निजाम भारतीय संघराज्यात विलीन होण्यास तयार होत नाही. व हिंदूवर करत असलेल्या अत्याचारामुळे निजामाला ठार मारण्याचे प्रयत्न झाले. असा प्रयत्न आर्य समाजाच्या नारायण पवार यांनी केला. भालकी तालुक्यातील सबळदाब येथील नारायण पवार या तरूणाने गंगाराम आणि जगदीश यांना सोबत घेवून निजामाला ठार मारण्याचा कट रचला. त्यासाठी सोलापूरहून पिस्तुल आणि बॉब मिळविला व 4 डिसेंबर 1947 रोजी निजाम ऑलसेंट शाळेच्या गल्लीसमोर येताच नारायण यांने निजामावर बॉब टाकला.[16] नारायण पवारला पकडून त्यास पाशीची शिक्षा देण्यात आली पण हैद्राबाद संस्थान भारतात 1948 पर्यंत विलीन होईपर्यंत त्याला फाशीची शिक्षा दिली नाही म्हणून नारायण पवार वाचले.

अशाप्रकारे निजामाच्या विरूध्द जनमत तयार करून लोकामध्ये राष्ट्रभक्त , देशप्रेम व स्वदेशाभिमान निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी केले. त्यामुळे आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यास हौतात्म्य प्राप्त झाले. हौतात्म्य त्यांच्या वैयक्तिक मोहापायी नव्हते तर देशासाठी आणि संस्थानातील जनतेस नागरी स्वातंत्र्य प्राप्त व्हावे यासाठी होते.

**स्वदेशीचा पुरस्कार–**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत स्वेदशी हे एक प्रेरणास्त्रोत मानले जाणारे मूल्य होते. बाबू गेणू सारखी अनेक सामान्य लोकांनी स्वदेशासाठी बलिदान देवून हौतात्म्य पत्करले. हैद्राबाद मुक्ती आंदोलनामध्येही स्वदेशीच्या माध्यमाने लोकात देशाभिमान निर्माण करण्याचे कार्य संस्थानामधील असंख्य कार्यकर्त्यांनी केले. त्यात आर्य समाजाचे कार्यकर्ते अग्रेसर होते. हैद्राबाद संस्थानामध्ये दत्ता आप्पाजी तुळजापूरकर, अघोरनाथ चटोपाध्याय, न्या.केशवराव कोरटकर आदींनी स्वदेशीचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळेच ब्रिटीश रेसिडेंटच्या सांगण्यावरून निजाम सरकारने अनेकांना हद्दपार केले.

1938 च्या नंतर हैद्राबाद मुक्ती आंदोलनामध्ये सत्याग्रह , कायदेभंग , जंगल सत्याग्रह झेंडा सत्याग्रह, वंदे मातरम, साराबंदी अशा ज्या चळवळी उभारल्या त्या सर्व आंदोलनामध्ये आर्य समाजाच्या

कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. आर्य समाजाने सशस्त्र प्रतिकाराचाही मार्ग अवलंबिला होता. रायफल, स्टेनगण, पिस्तूल इ.शस्त्रे मिळवून ती चालविण्याचे प्रशिक्षण घेतले जाई. शस्त्रास्त्र खरेदीसाठी उमरी बॅंक लूटण्यात आली. या लुटीमागे, शस्त्रास्त्र मिळवणे हाच उद्देश होता.

**सोलापूरचे दयांनद कॉलेज–**

हैद्राबाद संस्थानामध्ये लोकांना निजामाविरूध्द लढण्याची मानसिकता तयार करून प्रत्यक्ष तशी प्रेरणा देण्याचे सोलापूरचे दयानंद कॉलेज एक केंद्र होते. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करण्याचे दयांनद कॉलेज एक केंद्रच होते. दयानंद कॉलेजचे प्राध्यापक व प्राचार्य आर्य समाजाच्या विचाराने प्रभावित झालेले होते. हैद्राबाद संस्थानात होत असलेल्या विविध संत्याग्रह आणि आंदोलनामध्ये दयानंद कॉलेजचे विद्यार्थी हिरीरीने भाग घेत असत. या कॉलेजमध्ये मराठवाडयातून आलेल्या विद्यार्थ्यांना हैद्राबाद स्टुडंन्ट युनियन ही संघटना स्थापन करून यामार्फत विद्यार्थ्यासाठी विनायकराव विद्यालंकार, पं. नरेंद्रजी, भाई बन्सीलाल इ. ची व्याख्याने आयोजित केली जात. [17] आर्य समाजाच्या नेत्याच्या या व्याख्यानामुळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्वराज्य प्राप्तीची प्रेरणा मिळत असे.

कॉलेजचे प्राचार्य श्रीराम शर्मा हे विद्यार्थ्यांना देशप्रेम, धर्मप्रेम आणि अन्यायाविरूध्द लढण्याची प्रेरणा देत. या प्रेरणेतून हैद्राबाद मुक्ती लढयात दयांनद कॉलेजचे विद्यार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात असे . विशेषतः उस्मानाबाद जिह्यातील प्रत्येक शिबीरात दयांनंद कॉलेजचे विद्यार्थी आघाडीवर होते. आधी स्वराज्य मग शिक्षण या ध्येयाने प्रेरीत होवून हे विद्यार्थी हैद्राबाद मुक्ती आंदोलन व भारताच्या आंदोलनात सहभागी होत म्हणूनच त्यावेळी दयानंद कॉलेज म्हणजे क्रांतीसाठी जीवंत शस्त्रे पुरविणारे एक कोठारच होते.

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, 1938 आणि नंतरच्या काळात हैद्राबाद मुक्ती आंदोलनामध्ये जरी स्टेट कॉग्रेस ही प्रमुख संघटना असली तरी या स्टेट कॉग्रेसला मनुष्यबळ पुरविण्याचे आणि स्वातंत्र्य आंदोलनासाठी पार्श्वभूमी निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजानेच केले. किबहुना आर्य समाजाच्या आंदोलनापासून तयार झालेले अनेक कार्यकर्ते नंतर स्टेट कॉग्रेसमध्ये सामील झाले. आर्य समाजाचे प्रमुख नेते स्वामी श्रध्दानंदजी हे कॉग्रेसचे अनुयायी होते. लाला लजपतराय , चंद्रभानू गुप्ता, चरणसिंग हे कार्यकर्ते आर्य समाजाचेच होते. नांदेड जिह्यात प्रारंभी आर्य समाजात कार्य करणारे प्रमुख कार्यकर्ते शामराव बोधनकर, भगवानराव गाजवे, गोपाळराव शास्त्रीदेव, उमरी बॅंक प्रकरणातील धनाजी पुरोहित , पं. नरेंद्रजी यांच्यासह अनेकजण नंतर कॉग्रेसमध्येच आले होते. अन्य संघटनाकडून कॉग्रेसमध्ये असंख्य लोक येण्याची प्रक्रिया संस्थानाबाहेर आधीपासूनच सुरू होती. आर्य समाज ही संघटना होती म्हणूनच हैद्राबाद संस्थानात स्टेट कॉग्रेसला आपले पाय रोवून उभा राहता आले. किंबहुना आर्य समाज ही कॉग्रेसच्या एक शाखा असल्यासारखे होते . आर्य समाजाच्या या कार्यामुळेच हैद्राबाद मुक्ती

आंदोलनाची चळवळ लोक चळवळ बनली. त्यामुळेच भारत सरकारला ही संस्थानात हस्तक्षेप करावा लागला.

हैद्राबाद मुक्ती आंदोलनात आर्य समाजाने दिलेल्या योगदानामुळे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल म्हणतात,''आर्य समाजाने येथे पाहिल्यापासूनच जर पार्श्वभूमी तयार केली नसती तर तीन दिवसात पोलिस कार्यवाही यशस्वी होणे महाकठीण होते.[18]'' यावरून हैद्राबाद मुक्ती आंदोलनामध्ये आर्य समाजाचे योगदान स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ–**


1) भालेराव अनंत–हैद्राबादच्या स्वातंत्र्य आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई –2001, पृ.3

2) डॉ. कवडेकर बाळकृष्ण(संपादक) – हैद्राबाद मुक्ती संग्राम – एक उपेक्षित संघर्ष गाथा, देवगिरी प्रकाशन, औरंगाबाद, 1998, पृ.68

3) डॉ. रणसुभे सुर्यनारायण – मी तुम्ही, धर्म आणि सत्ता, स्वरूप  प्रकाशन, औरंगाबाद–2004,पृ.85

4) काळे भगवान (संपादक) –मराठवाडा काल आणि आज – संकेत प्रकाशन, जालना – 1968, पृ.6

5) डॉ. कठारे अनिल –हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम व महात्मा गांधी, सुगावा प्रकाशन, पुणे– 2006, पृ.6

6) जावडेकर आचार्य –आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, 1994, पृ194

7) फडके य.दि. –विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड – 5, श्रीविद्या प्रकाशन, पुणे –1991,पृ.328

8) कुरूंदकर नरहर  –हैद्राबाद विमोचन व विसर्जन, रजत प्रकाशन औरंगाबाद – 1998, पृ.प्रस्तावना

9) परळकर अशोक  –हैद्राबादचा पहिला सत्याग्रह , रमामुकूंद प्रकाशन औरंगाबाद –मनोगत

10) जोशी द.पं. (संपादक) –काळाच्या पडद्याआड , खंड –3, मराठी साहित्य परिषद आंध्र प्रदेश हैद्राबाद,1992, पृ517

11)  जोशी द.पं. –हैद्राबाद संस्थान व लोकस्थिती – साहित्य प्रकाशन, औरंगाबाद – 1998, पृ.154

12) डॉ. रेडे  सोमनाथ  –मराठवाडयाचा इतिहास विद्याबुक्स पब्लीशर्स , औरंगाबाद –  199, पृ.60

13) गायकवाड नरेंद्र  – मराठवाडयातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम  – सुगावा प्रकाशन, पुणे , 1990, पृ.94

14) पोतदार वसंत  – हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम , विद्याभारती प्रकाशन, लातूर 2006 – पृ.55

15) फडके य.दी. – 20 व्या शतकातील महाराष्ट्र खंड –5, श्रीविद्या प्रकाशन,पुणे 1997 पृ.328

16) उपरोक्त – पृ. 345

17) पोतदार वसंत – उपरोक्त – पृ. 54

18) राठोर श्यामलाल – मुक्ती संग्रामचे नांदेड – ज्योती प्रकाशन नांदेड, 1976, पृ निवेदन –1